# घटना

कचरावेचकांचे आंतरराष्ट्रीय गटबंधन

घटनेच्या या अद्ययावत आवृत्तीमध्ये इंटरनॅशनल अलायन्स ऑफ वेस्ट पिकर्सच्या जागतिक सल्लागार समितीच्या दि. १७ ऑक्टोबर २०२२ च्या घटना अंगीकार सत्रात मंजूर केलेल्या सुधारणांचा समावेश आहे. इंग्रजी आवृत्ती https://globalrec.org/constitution वर ऑनलाइन उपलब्ध आहे


प्रस्तावना **3**

**0.** नाव **4**

१. ध्येय **4**

२. उद्दिष्टे व साध्ये **4**

३. व्याप्ती **6**

४. सभासदत्व **7**

५. सभासदत्व रद्द होणे **7**

६. सभासद शुल्क **8**

७. मध्यवर्ती समन्वय संरचना **8**

  ७.१ काँग्रेस 9

  ७.२. कार्यकारी समिती 10

  ७.३ पदाधिकारी 11

  ७.४ कार्यकारी समिती व पदाधिकाऱ्यांची निवडणूक 13

  ७.५ पदाधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे 13

  ७.६. हंगामी पदाधिकारी 14

  ७.७ सचिवालय 14

८. आर्थिक व्यवस्थापन **15**

९. संलग्न संघटनांची कर्तव्ये **16**

  ९.१ गटबंधन व संलग्न संघटनांतील परस्पर संबंध 16

  ९.२ संलग्न संघटनांची कर्तव्ये 16

१०. संविधानाचा अन्वयार्थ **17**

११. घटनादुरुस्ती **17**

१२. अधिकारी/नेत्यांची नुकसानभरपाई **17**

१३. विसर्जन **17**

१४. जोडलेले नियम **18**

# प्रस्तावना

आपापल्या खंडातील विविध प्रदेशांमध्ये संघटित झालेले आम्ही कचरावेचक,  recyclers, canners, dumpster divers, scrappers, and reclaimers, आमच्यातील संवादप्रक्रिया व संघटित शक्तीचा खालील घटने द्वारे दृगोच्चार करीत आहोत.

पर्यावरणाविषयी अतिशय आक्रमक व एकंदरीत सर्व प्रकारच्या जीवसृष्टीला धोक्यात आणणाऱ्या या जगातील साठवणूक करणाऱ्या, केंद्रीकरण करणाऱ्या, बहिष्कृत करणाऱ्या, नायनाट करणाऱ्या, वगळून टाकणाऱ्या, व्यवस्थेचे फळ असलेले आम्ही कचरावेचक इतिहासकाळापासून आमच्या उदरनिर्वाहाकरिता विविध स्वरूपाची कामे करीत आलो आहोत, एकत्र येऊन, चर्चा करून व संघटित होऊन आम्ही आमच्या कामाचा न्याय्य मोबदला, उचित सन्मान व पर्यावरणरक्षणातील आमच्या योगदानाची दखल घेतली जाण्याकरिता व आम्हाला नाकारले गेलेले हक्क मिळविण्याकरिता संघर्ष करीत आलो आहोत.

आमची ही मूलभूत घटना आमच्या बैठकांमध्ये झालेल्या चर्चांवर व निर्णयांवर व चर्चावर आधारलेली आहे. परंपरागतपणे व्यवस्थात्मक बहिष्कृतता अनुभवलेल्या कष्टकऱ्यांच्या हक्कांसाठी सामूहिक संघर्ष करताना वापरवयाची तत्वे यामधून विकसित अजली आहेत.

खरी लोकशाही ही अन्यायाविरुद्ध लढून मुक्तता मिळविण्याचे एक साधन, सहभागी व प्रमुख भूमिका बजावणारी संघटनात्मक संस्था, आम्ही प्रतिनिधित्व करीत असलेल्या सर्व कामगारांनी मान्य केलेल्या सामूहिक संघटन पद्धती, प्रामाणिकपणा व पारदर्शकता ही समता व न्याय मिळविण्याची साधने आमची उद्दिष्टे सुधारण्यकरिता व अद्ययावत करण्याकरिता समतोल व स्व-परीक्षण प्रक्रियांचा वापर,  पृथ्वी ही आपले निवासस्थान म्हणून अबाधित राखण्याकरिता कायमस्वरूपी काळजी, वंचितांची सेवा करण्याकरिता सत्तेचा वापर, विलासी वृत्ती, अपव्यय व अमानुष नफेखोरी विरुद्ध साधेपणा व समनतेला पाठिंबा.

खालील घटनेमध्ये आम्ही आमच्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या उद्दिष्टांचा व साध्यांचा, आमच्या व्यवसायातील विविधतेचा, आमच्या समर्थनात्मक साधानांच्या व्याप्तीचा, आमच्या संघटनेच्या तत्वांचा व समवेशकतेच्या गरजांचा, आमच्या केंद्रीय समन्वय रचनेचा, आमच्या कार्यकारिणीच्या कर्तव्यांचा, आमच्या मित्र संस्थांच्या हक्क व जबाबदाऱ्यांचा पुनरुच्चार, आदेश व प्रतिष्ठापना करत आहोत.

सहिष्णुता, संघटित प्रयत्न व शांततेच्या संस्कृतीस बढावा देण्याचा निर्धार करून आमच्या कामास मुल्य देण्याकरिता, आमच्या कामगारांना सन्मानपूर्ण व चांगले जीवन देण्याकरिता व आपले सामूहिक निवासस्थान सुरक्षित ठेवण्याकरिता बांधिलकी व्यक्त करून आम्ही या आंतरराष्ट्रीय कचरावेचक संघटनेतील आमच्या संघटनाचे दृढिकरण करीत आहोत.

# 0. नाव

कचरावेचकांचे आंतरराष्ट्रीय गटबंधन

# १. ध्येय

गटबंधनाची स्थापना कचरा वेचकांचे प्रतिनिधित्व करणारे एक व्यासपीठ व मुखपत्र म्हणून केली जाईल. जगातील पुन:चक्रीकरण करणाऱ्या कामगारांच्या कामाचे संरक्षण करणाऱ्या व त्यांना ओळख मिळवून देणाऱ्या सार्वजनिक धोरणांचा पाठपुरावा करून हे गटबंधन या कामगारांच्या कामाची व जगण्याची परिस्थिती सुधारण्याकरिता कार्यरत असेल.

# २. उद्दिष्टे व साध्ये

गटबंधनाची उद्दिष्टे व साध्ये खालीलप्रमाणे असतील:

२.१ कचरावेचकांना त्यांचे संपूर्ण हक्क प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने कचरावेचकांची जाळेबंधणी व्यापक व मजबूत करणे व कचरवेचकांच्या आत्मसन्मानास जागतिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर बढावा देणे.

२.२. संलग्न संघटनांना राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर कचरावेचकांचे प्रतिनिधित्व करण्यात सहाय्य करणे

२.३ संघटनेच्या सर्व स्तरांवर कचरा वेचकांची क्षमता व नेतृत्वगुण विकसित व बळकट करणे व सरकारद्वारे एकात्मिक सहभागी कचरा व्यवस्थापनास चालना मिळेल व सर्व स्तरांवर कचरा वेचकांच्या मागण्या ऐकण्यात येतील, स्वीकारल्या जातील व त्यांना प्रतिसाद दिला जाईल याची खातरजमा करण्याकरिता रणनीती आखणे

२.४ जगभरातील कचरा वेचकांना स्वयं-संघटित होऊन व स्वयं-निर्णय घेऊन सदस्यत्व-आधारित संघटना स्थापन करण्यास प्रोत्साहन व सहाय्य देणे ज्यायोगे ते एकत्रितपणे आपल्या हक्कांचे व लाभांचे संरक्षण करण्यास सक्षम होतील

२.५ जगातील विविध भागांमध्ये कचरावेचक व अन्य अनौपचारिक कचरा कामगारांमध्ये असलेली वर्ग-असमानता लक्षात घेऊन, सर्वात दुर्लक्षित कचरा वेचकांचे राहणीमान व कामाची परिस्थिती सुधारण्यास प्राधान्य देणे

२.६ मार्गदर्शन व सहकार्य करून संलग्न संघाटनांमध्ये लोकशाही प्रक्रिया राबविण्यात सहाय्य करणे

२.७ कचरा वेचकांच्या पर्यावरण संरक्षणातील योगदानाची योग्य दखल घेऊन त्यास वाजवी मोबदला मिळवून देण्याकरिता समर्थनात्मक काम करणे ज्यामुळे मालाला वाजवी किंमत मिळणे, मूल्य साखळीमध्ये वाढीच्या संधी असणे व किमान वेतनाची हमी या बाबी जगभरातील लाखों कचरा वेचकांना मिळू शकतील

२.८ कचरा वेचक हे कचरा व्यवस्थापनावरील चर्चा व धोरणांमध्ये केंद्रस्थानी असल्याची खात्री करणे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, पुन:चक्रीकरण प्रणाली व घनकचऱ्याशी संबंधित निर्णयप्रक्रिया तसेच शून्य कचरा, उत्पादकांची विस्तारीत जबाबदारी, शहरी नियोजन व पर्यावरणीय कायद्यांशी संबंधित निर्णय प्रक्रियांमध्ये त्यांना समाविष्ट करून घेणे अभिप्रेत आहे

२.९ कचरा वेचकांना कचरा सुलभपणे उपलब्ध होऊन त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन सुरक्षित व्हावे याकरिता तसेच घनकचरा व्यवस्थापन व पुन:चक्रीकरण प्रणालींमध्ये त्यांचा समावेश निश्चित करण्याकरिता समर्थनात्मक काम करणे. यामध्ये सरकारकडून त्यांच्या मागण्यांना प्रतिसाद मिळविणे व एकात्मिक कचरा व्यवस्थापनामध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे अभिप्रेत आहे.

२.१० पुन:चक्रीकरण, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन व हवामान बदल कमी करण्यामधील कचरा वेचकांच्या योगदानाबद्दल स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणीव जागृती करणे. याव्यतिरिक्त, कचरा वेचकांना सरकार-पुरस्कृत पुनःचक्रीकरणाचे शुल्क मिळावे याकरिता समर्थनात्मक काम करणे

२.११ कचरा वेचकांना निरोगी, सुरक्षित व संरक्षित तसेच विषारी कचरा व घातक पदार्थांपासून मुक्त असलेले कामाचे वातावरण देणाऱ्या कार्यक्रमांकरिता समर्थनात्मक काम करणे. उत्पादन प्रक्रिया व सामग्रीमधील बदलांमुळे त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या विपरीत परिणामांपासून त्यांचे संरक्षण सुनिश्चित करणे. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय आरोग्य विमा निधी कचरावेचकांना उपलब्ध व्हावा याकरिता प्रयत्न करणे.

२.१२ कचरा वेचकांची जागतिक वास्तविकता समजून घेण्याकरिता त्यांची संख्या, परिस्थिती, लिंग, वय आणि इतर संबंधित निर्देशकांसह जगभरातील कचरा वेचकांवर एक व्यापक डेटाबेस तयार करणे.

२.१३ कचरा वेचकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याकरिता व त्यांना पाठिंबा देण्याकरिता प्रभावी संघटन धोरणांविषयक माहितीचे दस्तऐवजीकरण करून त्याचा प्रसार करणे.

२.१४ सहयोगी संघटनांना त्यांच्या संघटनांमध्ये अपंग व्यक्तींसह, युवा संरचना स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे

२.१५ पोलीस व अन्य संस्थात्मक शक्तींकडून कचरा वेचकांवर होणाऱ्या भेदभाव, छळ व अनादराचा विरोध करणे.

२.१६ कचरा वेचकांच्या मुलांचे शिक्षण सुलभ होण्याकरिता तसेच बालसंगोपनाच्या सेवा सुधारून बालमजुरीचे निर्मूलन करण्याकरिता सहयोगी संस्था, सरकार व अन्य स्वयंसेवी संस्थांसोबत सहयोग करणे.

२.१७ स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर कचरा जाळण्यासह सर्व प्रकारच्या अ-शाश्वत कचरा व्यवस्थापन पद्धतींचा विरोध करणे (ज्वलनबंदी).

२.१८ कचरा व्यवस्थापन व पुन:चक्रीकरण क्षेत्रातील कचरा वेचकांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम करणाऱ्या अनुचित व्यापार पद्धती दूर करण्यासाठी कार्य करणे.

२.१९ सर्व कचरा वेचकांना व्यावसायिक ओळख, सामाजिक कल्याण, सामाजिक सुरक्षा व लिंगभाव-संवेदनशील वैयक्तिक सुरक्षा साधने मिळावी याकरिता समर्थनात्मक काम करणे.

२.२० सामायिक हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता आंतरराष्ट्रीय महासंघ, अनौपचारिक कामगार संघटना व कामगार संघटनांसोबत भागीदारी वाढवणे.

२.२१ अलायन्सच्या उद्दिष्टांशी व घटनेशी सुसंगत काम करणाऱ्या व कचरा वेचकांना समर्थन देणाऱ्या एनजीओ, विद्यापीठे आणि संशोधन संस्थांसोबत सामाजिक भागीदारी प्रस्थापित करणे.

२.२२ या घटनेत नमूद केलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने विविध माध्यमांद्वारे (उदा. निधी उभारणी) प्राप्त केलेल्या संसाधानांचे व्यवस्थापन व वाटप करणे व त्यांचा वापर व देखरेख करताना सहमती व स्पष्टता राखणे.

# ३. व्याप्ती

आंतरराष्ट्रीय गटबंधन हे कचरावेचकांची कामगार संघटना मानली जाते. कचरवेचकांच्या जगभरातील समूहाअंतर्गत असलेल्या विविध प्रकारच्या उपगटांच्या संरक्षणार्थ काम करणाऱ्या विविध संघटना ज्यांचे प्रतिनिधित्व करतात ते सर्व कचरावेचक या आंतरराष्ट्रीय गटबंधनाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहेत. आपापल्या संघटनांमध्ये पर्यावरण संवर्धन, प्रशासकीय सहाय्य किंवा अन्य कामे करणारे कचरावेचक देखील यामध्ये समाविष्ट आहेत.

३.१ आंतरराष्ट्रीय गटबंधनामध्ये कचरावेचकांची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे:

अ. अनौपचारिक किंवा अर्ध – औपचारिक स्वयंरोजगारी पद्धतीने कचऱ्याचे संकलन, निवड, वर्गीकरण, पुनःचक्रीकरणयोग्य मालाची (कागद, प्लॅस्टिक, पत्रा, काच) विक्री ही कामे करणाऱ्या व्यक्ति

ब. फिरते कचरावेचक, अनौपचारिक किंवा अर्ध – औपचारिक पद्धतीने कचऱ्याची वाहतूक, वर्गीकरण, पुनःचक्रीकरणयोग्य मालाची विक्री करणाऱ्या व्यक्ति, अनौपचारिक किंवा अर्ध – औपचारिक वर्गीकरण/पुनःप्राप्ती/पुनःचक्रीकरण क्षेत्राच्या अंतर्गत, कचऱ्याची वाहतूक, वर्गीकरण करणारे अनौपचारिक कामगार, किंवा म्युनिसिपल कचरा व्यवस्थापनामध्ये समाविष्ट केल्या गेलेल्या व कचऱ्याचे वर्गीकरण व विक्री करीत असलेल्या वरीलपैकी कोणत्याही व्यक्ति

क.	पूर्वी कचरावेचक असलेल्या परंतु नंतर आपापल्या पुनःचक्रीकरण संघटनांमध्ये पर्यावरण संवर्धन, काळजी, आरोग्य कार्यक्रम, लिंगभाव कार्यक्रम इ. कामांमध्ये नवीन भूमिका पार पाडत असलेल्या व्यक्ति

३.२. संघटनेचा प्रकार

खालीलपैकी सर्व अटी पूर्ण करणाऱ्या स्थानिक, राष्ट्रीय किंवा प्रादेशिक संघटना आंतरराष्ट्रीय गटबंधनाच्या सभासद होऊ शकतील:

a. लोकशाही पद्धतीने काम करणाऱ्या व उत्तरदायीत्व जपणाऱ्या
b. सभासदत्वावर आधारित असलेल्या, अर्थात, अनौपचारिक कचरवेचकांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणातील, उदा. सहकारी संस्था, कामगार संघटना, संस्था, इ.
c. प्रामुख्याने अनौपचारिक कचरा वेचकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या
d. आपल्या सभासदांच्या कामाला असलेला कलंक दूर करण्याकरिता व त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारण्याकरिता काम करणाऱ्या
e. संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्क जाहीरनामा १९४८ मधील मूलभूत तत्वांचे पालन करणाऱ्या
f. लोकशाही व न्यायिक तत्वांवर आधारित असलेली लेखी घटना असणाऱ्या, तसेच त्यांच्या सभासदांनी मान्य केलेले नियमित आर्थिक अहवाल असलेल्या

# ४. सभासदत्व

४.१	पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या कोणत्याही संघटना, आवश्यक त्या कागदपत्रांसह व तपशीलांसह अर्ज करू शकतात (सोबत जोडलेले नियम पहा)

४.२	देशातील/ प्रदेशातील चालू सभासदांकडून अर्जदार संघटनेच्या पात्रतेविषयी प्रतिक्रिया / पडताळणी केली गेल्यानंतर अर्जदार संघटनेचे सभासदत्व मान्य केले जाईल

४.३	या घटनेत घालून दिलेल्या सभासदत्वाच्या निकषांनुसार अर्ज मान्य किंवा अमान्य करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळातर्फे घेतला जाईल

४.४	अर्जदार संघटनांची विश्वसनीयता तपासण्याकरिता वरील कलम ३ – व्याप्ती- शी सुसंगती साधणारी एक संदर्भचौकट विकसित केली जाईल

४.५	प्रमाणाधारित तत्वावर, अर्थात, संघटनेच्या पूर्ण वर्गणी भरलेल्या व कृतिशील संभासदांच्या संख्येवर, संघटनेस मिळणारी मते अवलंबून असतील

४.६	बहुक्षेत्रीय संघटनांमधील (वरील ३.२ –c, नुसार) कचरा वेचक घटकातील सभासद, संघटनेचे प्रतिनिधित्व करतील

४.७ नियमितपणे वार्षिक सभासद शुल्क भरणे व गटबंधनातील अन्य जबाबदऱ्या पार पाडणे यावर सभासदत्वाचे नूतनीकरण अवलंबून असेल

# ५. सभासदत्व रद्द होणे

५.१ कोणतीही संघटना, कार्यकारी मंडळास किमान तीन (३) महिन्यांची लेखी सूचना देऊन गटबंधनातून बाहेर पडू शकते. सभासदत्वाचा राजीनामा देणाऱ्या संघटनेस सभासद शुल्क परत केले जाणार नाही

५.२ गटबंधनाच्या घटनेतील कलामांचे किंवा तत्वांचे उल्लंघन केल्यास, कलम ४ मधील पात्रता निकषांनुसार पात्रता संपुष्टात आल्यास, किंवा गटबंधनाच्या किंवा एकंदर कचरवेचकांच्या हितसंबंधांविरोधी काम केल्यास त्या संघटनेचे सभासदत्व निलंबित केले जाईल किंवा संघटनेस गटबंधनातून बाहेर काढले जाईल

५.३ कलम ५.२ मधील दिलेल्या कारणांचा उल्लेख करून कार्यकारी मंडळ एखाद्या संघटनेचे सभासदत्व निलंबित किंवा रद्द करू शकते. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार कार्यकारी मंडळ, सभासदत्व रद्द करण्याच्या प्रस्तावावर संबंधित संघटनेस आपली बाजू मांडण्याची संधी देईल. अशा प्रकारची सुनावणी एका स्वतंत्र समितीसमोर केली जाईल, ज्या समितीमध्ये सध्या कार्यकारी मंडळात नसलेल्या संघटनांचा समावेश असेल तसेच त्यापैकी कोणत्याही संघटनेतील सभासद पदाधिकारी म्हणून निवडून आलेला नसेल. अशा प्रकारच्या कोणत्याही निर्णयावर कॉँग्रेस कडून त्यांच्या पुढील बैठकीत मत दिले जाईल. कॉँग्रेस आपले मत व्यक्त करेपर्यंत, निलंबित किंवा रद्द केलेल्या संघटनेस कॉँग्रेस च्या पुढील बैठकीपूर्वी आपल्या पात्रतेची ग्वाही देणारी कागदपत्रे सादर करून निलंबन किंवा रद्द ठरण्याच्या विरोधात अपील करता येईल.

५.४ सभासदत्व निलंबित किंवा खंडित केलेल्या संघटनेस सभासद शुल्क किंवा अन्य बाकी परत केली जाणार नाही तसेच गटबंधनाच्या सभासदांना लागू असलेल्या कोणत्याही सवलती, लाभ वा हक्क मिळू शकणार नाहीत.

# ६. सभासद शुल्क

६.१ संलग्नता शुल्क आणि वार्षिक सभासदत्व शुल्क कार्यकारी समितिद्वारे निश्चित केले जाईल, जी अशा सर्वसमावेशक यंत्रणा विकसित करण्याकरिता प्रयत्नशील असेल ज्या त्या क्षेत्राचे अनौपचारिक स्वरूप लक्षात घेऊन संघटित होणे आणि लढणे यास प्राधान्य देऊन आर्थिक शुल्कामुळे कोणीही वगळले जाणार नाही याची काळजी घेईल;

६.२ शुल्क प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० एप्रिलपूर्वी भरले जाईल. शुल्क न भरल्यास सदस्यत्व आणि मतदानाचे अधिकार आणि कोणत्याही समितीवरील सदस्यत्वासह सर्व अधिकार व विशेषाधिकार निलंबित केले जातील. कोणत्याही सदस्य संघटनेने एक वर्ष शुल्क न भरल्यास, सभासदत्व निष्क्रिय केले जाईल आणि त्या संघटनेस मतदान करण्याचा किंवा सदस्यत्वाचा

कोणताही लाभ घेण्याचा अधिकार राहणार नाही. दोन वर्षे शुल्क न भरल्यास, सदस्यत्व रद्द केले जाईल;

६.३ कोणत्याही असाधारण परिस्थितीमुळे संलग्नता/वार्षिक सभासदत्व शुल्क माफ करण्याचा निर्णय कार्यकारी समितीद्वारे एक किंवा अधिक सदस्य संघटनांकरिता घेतला जाऊ शकेल. तथापि, अशी शुल्कमाफी कार्यकारी समितीद्वारे प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे विचार करून केली जाऊ शकते.

# ७. मध्यवर्ती समन्वय संरचना

गटबंधन खालील प्रशासकीय संरचनांतर्गत कार्य करते:

## ७.१ काँग्रेस

७.१.१ गटबंधनाची निर्णय घेणारी सर्वोच्च संस्था म्हणून काँग्रेस काम करते.

७.१.२ यामध्ये सर्व संलग्न कचरा वेचक संस्था व काँग्रेसची कार्यकारी समिती समाविष्ट आहे.

७.१.३ (खालील कलम ८.४ नुसार) निवडणुकीद्वारे नेमण्यात आलेले अध्यक्ष, काँग्रेसच्या अध्यक्षपदी असतील.

७.१.४ (खालील कलम ८.४ नुसार) निवडलेली कार्यकारी समिती काँग्रेसला मार्गदर्शन करते

७.१.५ कार्यकारी समिती प्रत्येक काँग्रेसची तारीख, स्थान, अजेंडा आणि कार्यपद्धती ठरवते.

७.१.६ किमान चार (४) महिने अगोदर, कार्यकारी समिती संलग्न संघटनांना काँग्रेसची तारीख व स्थान सूचित करते.

७.१.७ काँग्रेस दर पाच (५) वर्षांनी किमान एकदा बैठक घेते.

७.१.८ कार्यकारी समितीस अतिरिक्त काँग्रेस बोलावण्याचा अधिकार आहे.

७.१.९ संलग्न संघटनांच्या साध्या बहुमताने दाखल केलेल्या याचिकेद्वारे देखील असाधारण काँग्रेस बोलावली जाऊ शकते.

७.१.१० प्रत्येक संघटनेतील काँग्रेस प्रतिनिधींची संख्या ही त्या- त्या संलग्न संघटनेतील पूर्ण शुल्क भरलेल्या सदस्यांच्या संख्येवर आधारित असेल, खालीलप्रमाणे:

a. १-१०० सदस्य संख्या असणाऱ्या संलग्न संघटना एक (१) मतदान प्रतिनिधीस पात्र असतील

b. १०१-१००० सदस्य संख्या असणाऱ्या संलग्न संघटना दोन (२) मतदान प्रतिनिधीस पात्र असतील

c. १००१-५००० सदस्य संख्या असणाऱ्या संलग्न संघटना तीन (३) मतदान प्रतिनिधीस पात्र असतील

d. ५००० पेक्षा जास्त सदस्य असलेल्या संलग्न संघटना चार (४) मतदान प्रतिनिधींस पत्र असतील

e. एखाद्या देशात राष्ट्रीय पातळीवरील सदस्यत्व-आधारित संघटना अस्तित्वात असल्यास, त्या संस्थांमधून प्रतिनिधी निवडले जातील. राष्ट्रीय संघटनांच्या अनुपस्थितीत, गटबंधनामध्ये स्थानिक संस्थांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी निकष स्थापित केले जातील.

७.१.११काँग्रेस प्रतिनिधींपैकी किमान पन्नास टक्के (50%) या महिला, नॉन-बायनरी किंवा ट्रान्स व्यक्ति असणे आवश्यक आहे.

७.१.१२ ज्या संघटनांनी पूर्ण सभासदत्व शुल्क भरलेले असेल त्यांनाच प्रतिनिधित्वाचा अधिकार असेल.

७.१.१३ गटबंधनातील कार्यकर्ते देखील कार्यकारी समितीच्या मान्यतेने काँग्रेस मध्ये उपस्थित राहू शकतील.

७.१.१४ प्रतिनिधीत्वाचे निकष पूर्ण करणाऱ्या एकूण प्रतिनिधींपैकी ५०% +१ सदस्य उपस्थित असल्यास कोरम पूर्ण झाल्याचे मान्य करण्यात येईल. २४ तासात कोरम पूर्ण न झाल्यास काँग्रेस स्थगित करण्यात येईल.

७.१.१५ विषयपत्रिका (agenda) कार्यकारी समितीद्वारे निश्चित केली जाईल ज्यात पुढील बाबींचा समावेश असेल:

अ. संविधान, कायदे, नियम मान्य करणे व त्यात दुरुस्त्या करणे

ब. सचिवालय व अध्यक्षांकडून अहवाल;

क. कार्यकारी समिती/ संलग्न संघटनांनी सादर केलेली मंजूर धोरणे व ठराव;

ड. मंजुरीसाठी आर्थिक अहवाल;

इ. मंजुरीकरिता समित्या गठित करणे, यात निवडणूक, युवा, प्रादेशिक समित्यांसह अन्य विषय-समित्या असतील;

## ७.२. कार्यकारी समिती

७.२.१ कार्यकारी समितीची निवड काँग्रेस करेल

७.२.२ त्यामध्ये एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व एक खजिनदार असतील

७.२.३ कार्यवाह / सचिव नेमण्याची व त्यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारी कार्यकारी समितीवर असेल

७.२.४ कार्यकारी समितीमध्ये प्रत्येक प्रादेशिक गटाचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे व त्याकरिता प्रत्येक प्रदेशातून नेमणुकीकरिता नामांकने पाठवली जातील. (अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि खजिनदार यांच्या व्यतिरिक्त, कार्यकारी समितीमध्ये याप्रमाणे प्रादेशिक प्रतिनिधित्व समाविष्ट आहे: आशिया, लॅटिन अमेरिका व आफ्रिकेकरिता अनुक्रमे 5 प्रतिनिधी व उत्तर अमेरिका व युरोपकरिता प्रत्येकी 2 प्रतिनिधी).

७.२.५ कार्यकारी समितीत किमान पन्नास टक्के (50%) महिला सदस्य असणे आवश्यक आहे.

७.२.६ कार्यकारी समितीचे सदस्य कचरावेचक असतील व त्यांना त्यांची कार्यकारी कर्तव्ये पार पाडण्याकरिता पदाधिकाऱ्यांकडून योग्य ते सहकार्य दिले जाईल.

७.२.७ कार्यकारी समिती जगातील निरनिराळ्या प्रदेशात अस्तित्वात असलेल्या कचरावेचक संघटनांची यादी, त्यांचे सदस्यत्व व आकार यांचा आढावा घेईल. भौगोलिक प्रतिनिधित्व संतुलित व इष्टतम राहावे याकरिता कार्यकारी समिती बहुमताच्या ठरावाद्वारे प्रादेशिक सीमांकन निश्चित करेल.

७.२.८ कार्यकारी समितीचा कार्यकाळ दोन काँग्रेसमधील पाच (5) वर्षांचा असेल.

७.२.९ कार्यकारी समितीतील सदस्य निवृत्त किंवा काही कारणाने अनुपलब्ध झाल्यास पर्यायी सदस्य नेमण्यात येतील. जर पर्याय उपलब्ध नसेल तर निवृत सदस्य ज्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व करीत होते त्या प्रदेशातील संलग्न संघटनांच्या मतानुसार नवीन सदस्यांचे नामांकन घेण्यात येईल.

७.२.१० कार्यकारी समिती ३ महिन्यातून एकदा ऑनलाइन पद्धतीने भेटेल

७.२.११ सरचिटणीसांकडून कार्यकारी समितीस बैठकीची आगाऊ सूचना २ आठवड्यांपूर्वी दिली जाईल

७.२.१२ ५०% + १ मत ही कोरम पूर्ण करण्याची संख्या असेल

७.२.१३ कार्यकारी समितीचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

a. गटबंधनाच्या कामास बढावा देणे;

b. गटबंधनाची उद्दिष्टे व साध्ये पूर्ण करणे;

c. गटबंधनाचे ठराव, कृती, योजना व धोरणांची अंमलबजावणीची करणे व त्यावर देखरेख करणे;

d. सचिवालयाच्या कामकाजावर देखरेख करणे;

e. उपसमित्यांच्या कामावर देखरेख करणे;

f. अंदाजपत्रक व अहवालांना मंजूरी देणे;

g. संलग्न संघटनांच्या प्रस्तावांवर विचार करणे;

h. काँग्रेसचे नियोजन करणे;

i. कर्मचारी व उप-समित्यांच्या सदस्यांवर कामे सोपविणे;

j. काँग्रेसच्या सहमतीने सभासद संलग्नता अर्जांची मंजूरी किंवा निलंबनाचे निर्णय घेणे

## ७.३ पदाधिकारी

### ७.३.१ अध्यक्ष

काँग्रस एका कार्यकालाकरिता अध्यक्षांची निवड करेल ज्याचे नूतनीकरण निवडणुकीद्वारे केवळ आणखी एका कार्यकालाकरिताच केले जाऊ शकेल. निवडलेली व्यक्ति कोणत्याही कारणास्तव अध्यक्षपदावरून निवृत्त झाल्यास, कार्यकारी समिती अध्यक्षांच्या जागी उपाध्यक्षांची नियुक्ती करेल. अध्यक्षांची कामे व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

a. काँग्रेसचे व कार्यकारी समितीच्या बैठकांचे अध्यक्ष या नात्याने काम पाहणे;

b. बैठकांमध्ये, संलग्न संघटनांच्या काँग्रेस मध्ये तसेच बाह्य संघटनांमध्ये गटबंधनाचे प्रतिनिधीत्व करणे;

c. काँग्रेस व कार्यकारी समितीने नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणे

### ७.३.२ उपाध्यक्ष

काँग्रस एका कार्यकालाकरिता उपाध्यक्षांची निवड करेल ज्याचे नूतनीकरण निवडणुकीद्वारे केवळ आणखी एका कार्यकालाकरिताच केले जाऊ शकेल. अध्यक्षांच्या गैरहजेरीत किंवा त्यांच्याकडून तसा आदेश दिला गेल्यास उपाध्यक्ष अध्यक्षांची कर्तव्ये बजावतील.

### ७.३.३ खजिनदार

काँग्रस एका कार्यकालाकरिता खजिनदारांची निवड करेल ज्याचे नूतनीकरण निवडणुकीद्वारे केवळ आणखी एका कार्यकालाकरिताच केले जाऊ शकेल. खजिनदारांची कामे व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

a. गटबंधनाच्या एकंदर आर्थिक कारभारावर देखरेख करणे

b. गटबंधनाचे सर्व हिशोब व्यवस्थित ठेवले जाण्याकरिता योग्य ती पावले उचलणे

c. गटबंधनाच्या हिशोबांचे लेखा परीक्षण करून घेणे

d. गटबंधनाचा वार्षिक ताळेबंद व जमा खर्चाचा अहवाल तयार करणे

e. गटबंधनाचा वार्षिक ताळेबंद व जमा खर्चाचा अहवाल सभासदांसमोर मांडणे किंवाा त्यांना तो उपलब्ध करून देणे

f. या पदाकडून सर्वसाधारणपणे व प्रथेनुसार अपेक्षित असलेली अन्य सर्व कामे पार पाडणे

७.३.४ सरचिटणीस

सरचिटणीस हे काँग्रेसने नेमलेले नसून कार्यकारी समितीने नियुक्त केलेले असतील. अनौपचारिक कचरा वेचक गटांसोबत काम करण्याचा किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा अनुभव असणे ही प्राथमिक अट पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवून त्यातून सरचिटणीसांची निवड केली जाईल. सरचिटणीस हे पूर्णवेळ, पगारी कर्मचारी असतील व गटबंधनाच्या सर्व समित्यांचे पदसिद्ध सदस्य असतील. सरचिटणीस कार्यकारी समितीस उत्तरदायी असतील व काँग्रेसचे निर्णय व योजना अंमलात आणण्यासाठी पदाधिकाऱ्यांसोबत जवळून काम करतील. सरचिटणीसांची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

a. कार्यकारी समितीच्या ठराव व निर्देशांनुसार सचिवालयाकडून तत्परतेने कामे पूर्ण करून घेणे व त्यांचे व्यवस्थापन करणे;

b. काँग्रेस व कार्यकारी समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त लिहिणे व प्रसृत करणे;

c. संलग्न संघटनांशी प्रभावी संप्रेषण करणे;

d. आर्थिक उपलब्धतेनुसार आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक समन्वयकांचा, व गरजेनुसार अन्य मदतनीसांचा एक सक्षम कार्यालयीन कर्मचारी वर्ग नियुक्त करणे;

e. गटबंधनाच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन करणे, वार्षिक आर्थिक अहवाल व प्रस्तावित अर्थसंकल्प कार्यकारी समितीसमोर सदर करणे व गटबंधनाचे हिशोब व नोंदी लेखापरीक्षणाकरिता तयार ठेवणे;

f. बैठकींमध्ये, संलग्न संघटनांच्या काँग्रेसमध्ये तसेच अन्य बाह्य संघटनांमध्ये गटबंधनाचे प्रतिनिधित्व करणे;

## ७.४ कार्यकारी समिती व पदाधिकाऱ्यांची निवडणूक

अध्यक्ष, उपाध्यक्ष व खजिनदार यांची निवड खालील प्रकारे केली जाईल:

७.४.१ सरचिटणीस नामांकने मागवतील;

७.४.२ नामनिर्देशनपत्रे निवडणूक समितीकडे जातील;

७.४.३ काँग्रेसमध्ये गुप्त मतदानाद्वारे निवडणूक होईल;

७.४.४ निवडून आलेले दोन किंवा अधिक पदाधिकारी महिला, नॉन- बायनरी किंवा ट्रान्स व्यक्ति असले पाहिजेत;

७.४.५ निवडून आलेले कोणतेही दोन पदाधिकारी एकाच प्रदेशातील नसावेत;

७.४.६ सचिव वगळता सर्व पदाधिकारी पदे प्रदेशांमध्ये फिरवली जातील;

७.४.७   जर उमेदवाराने पदासाठी केलेले तिचे/तिचे नामांकन लेखी स्वरूपात  स्वीकारले असेल, तर नामनिर्देशित उमेदवार त्यांच्या गैरहजेरीत देखील निवडले जाऊ शकतील;

७.४.८   कोणत्याही उमेदवाराला बहुसंख्य मते न मिळाल्यास, सर्वात जास्त वैध मते असलेले पहिले दोन (2) उमेदवार विजय निश्चित करण्याकरिता मतदानाच्या दुसऱ्या फेरीतून जातील;

७.४.९   गटबंधनाची एकंदर उद्दिष्टे व कृतियोजना काँग्रेस ठरविते याची पदाधिकाऱ्यांना जाणीव असेल;

७.४.१०   अध्यक्ष, उपाध्यक्ष व खजिनदार यांना देय असलेले कोणतेही मानधन काँग्रेस ठरवेल. शक्यतो त्यांचे वेतन त्यांच्या मूळ संघटनांद्वारेच दिले जावे, म्हणजेच, या भूमिका मोबदला घेऊन केल्या जाऊ नयेत असे अपेक्षित आहे. कर्तव्ये पूर्ण करण्याच्या संदर्भात केल्या गेलेल्या खर्चाची भरपाई दिली जाईल.

## ७.५   पदाधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे

अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार व सरचिटणीस खालीलपैकी कोणतीही परिस्थिती उद्भवल्यास पदे सोडतील:

a. गटबंधन किंवा त्यातील कोणत्याही सदस्य संघटनेच्या सदस्यत्वातून राजीनामा, निलंबन किंवा हकालपट्टी झाल्यास किंवा कार्यकारी समितीच्या दोन-तृतीयांश बहुमतानुसार गैरवर्तणूक केल्याबद्दल निलंबन किंवा पदावरून हकालपट्टी झाल्यास;

b. कार्यकारी समितीच्या सलग तीन (३) बैठकांना परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास;

c. निलंबन/हकालपट्टीच्या प्रस्तावाच्या बाबतीत, कार्यकारी समितीतील प्रादेशिक प्रतिनिधींमार्फत सदर सूचना त्यांच्या त्यांच्या प्रदेशातील संघटनांना किमान नव्वद (९०) दिवस अगोदर दिली जाईल व सदस्य संघटनांचे त्यावरील मत प्राप्त केले जाईल. मोठे मतभेद असल्यास, साध्या बहुमताने देखील सदस्यांना एक्स्ट्राऑर्डिनरी काँग्रेस (काँग्रेस बोलावण्यासंबंधीच्या तरतुदींनुसार) बोलावण्याचा अधिकार असेल.  तथापि, निष्कासन/निलंबनासाठी दोन-तृतीयांश (२/३) बहुमत आवश्यक असल्याने असे होण्याची शक्यता नाही.

## ७.६. हंगामी पदाधिकारी

७.६.१   काँग्रेसमध्ये पदाधिकारी पद रिक्त झाल्यास, कार्यकारी समिती मतपत्रिकेद्वारे, दोन तृतीयांश (२/३) बहुमताने, पुढील सामान्य कॉग्रेस पर्यंत प्रभारी क्षमतेत कार्यकारी समितीच्या सदस्यांमधून एखाद्या व्यक्तीची निवड करेल.;

७.६.२   अशी रिक्त जागा भरण्यासाठी निवडून आलेले सदस्य त्या पदाच्या उर्वरित कालावधीकरिता ते पद भूषवितील;

७.६.३ अशा सर्व निवडणुका नामांकनाचे प्रस्ताव, त्याला दुजोरा व त्यावर मतपत्रिकेद्वारे बहुमत मिळवून होतील.

### ७.७ सचिवालय

सचिवालय ही गटबंधनाची प्रशासकीय संरचना असेल, जी खालीलप्रमाणे नियंत्रित व कार्यान्वित केली जाईल:

a. सचिवालयाचे नेतृत्व सरचिटणीस करतील, जे गटबंधनाच्या दैनंदिन कामकाज व्यवस्थापन करतील व कार्यकारी समिती व काँग्रेसला उत्तरदायी असतील;

b. यामध्ये कामकाज चलविण्याकरिता पूर्णवेळ सशुल्क कर्मचारी नियुक्त केलेले असतील;

c. याचे कामकाज कार्यकारी समितीच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यात येईल;

d. सर्व बैठकांचे व्यावस्थापन, विविध कामांमधील समन्वय, सदस्यत्व व्यवस्थापन, अहवाल लेखन व इतर संस्थांशी समन्वय साधण्याचे काम सचिवालयायाद्वारे केले जाईल;

e. हे काम ना-नफा तत्वावर केले जाईल.

# ८. आर्थिक व्यवस्थापन

८.१ गटबंधनाचे आर्थिक व्यवस्थापन ते ज्या देशामध्ये नोंदणीकृत असेल व/किंवा जेथून सचिवालय कार्य करत असेल त्या देशाच्या वित्तीय व कायदेशीर नियमांचे पालन करेल;

८.२ गटबंधनाचा निधी सभासद शुल्क, अनुदान व निधी देणाऱ्या संस्थांकडून मिळविलेल्या देणग्या, तसेच आमच्या तत्त्वांशी व सहयोगी मूल्यांशी सुसंगत असणाऱ्या व त्यांचा आदर राखणाऱ्या सर्व प्रकारच्या निधी स्त्रोतांकडून मिळालेले अनुदान यातून उभारला जाईल;

८.३ गटबंचनाच्या सर्व खात्यातील निधी गटबंधनाचे प्रशासन चलविण्याकरिता (निधीच्या पंचवीस टक्के (२५%) पर्यंत), मालमत्ता संपादन करण्याकरिता व/किंवा गटबंचनाच्या घटनेच्या कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता तसेच कार्यकारी समितीद्वारे किंवा गटबंधनाच्या सदस्य संघटनांच्या बहुमताद्वारे ठरवल्या गेलेल्या इतर कायदेशीर उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता वापरला जाईल;

८.४ गटबंधन हे ना-नफा तत्ववार चालविले जाईल व आपल्या संसाधानांचे वाटप या घटनेच्या कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या उद्देश्यांकरिताच करेल व खर्च जाऊन उर्वरित निधी राहिल्यास त्याचा वापर सदस्य संघटनांना लाभांश किंवा बोनस देण्याकरिता करणार नाही.

८.५ कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या बँकेत गटबंधनाच्या नावाने बँक खाते उघडले जाईल. गटबंधनाच्या खात्यांवर स्वाक्षरी करणारे अध्यक्ष, सरचिटणीस याव्यतिरिक्त दोन (२) इतर व्यक्ती असतील ज्या सहज उपलब्ध असतील व ज्यांना कार्यकारी समितीने या उद्देशाकरिता

नियुक्त केले असेल. वरीलपैकी कोणत्याही दोन (२) व्यक्ति प्रत्येक व्यवहारावर संयुक्तपणे स्वाक्षरी करतील;

८.६ उपरोक्त कलम ८.५ मध्ये स्वाक्षरी करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ति कार्यकारी समितीद्वारे दर पाच (५) वर्षांनी बदलल्या जातील;

८.७ उत्पन्न व खर्चाची विवरणपत्रे व गटबंधनाच्या आर्थिक स्थितीचे अहवाल हे सरचिटणीसांनी तयार करून दर सहा महिन्यांनी कार्यकारी समितीस सादर केले पाहिजेत व तद्नंतर कार्यकारी समिती ते काँग्रेसला सादर करेल;

८.८ गटबंधनाच्या सर्व खात्यांचे वार्षिक लेखापरीक्षण कार्यकारी समितीने नियुक्त केलेल्या व संबंधित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार लेखापाल/लेखा परीक्षक म्हणून नोंदणीकृत असलेल्या व्यक्ती/कंपनीद्वारे केले जाईल;

८.९ गटबंधनाची एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरणे, ताळेबंद व लेखापरीक्षकांचे अहवाल कार्यकारी समितीद्वारे पडताळणी करून सदस्य संघटनांना सादर केले जातील;

८.१० उपरोक्त कलम 8.8 आणि 8.9 मध्ये नमूद केलेल्या लेखापरीक्षकाच्या अहवालात असे नमूद केले जाईल की:

a. गटबंधनाच्या लेखा व नोंदी त्यांनी तपासल्या असून सिक्युरिटीजच्या अस्तित्वाबद्दल ते समाधानी आहेत;

b. हिशोबाची पुस्तके योग्य पद्धतीने राखलेली असून त्याविषयी ते समाधानी आहेत;

c. त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे;

d. त्यांच्यामते मिळकत व खर्चाचे विवरण व त्यांनी लेखापरीक्षित केलेला ताळेबंद योग्यरित्या तयार केला आहे, ज्यामधून, त्यांच्या ज्ञानानुसार व त्यांना दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार तसेच ताळेबंदाच्या तारखेस गटबंधनाच्या पुस्तकांत दर्शविल्यानुसार, गटबंधनाच्या स्थितीचे सत्य व योग्य प्रतिबिंब दिसून येते;

e. त्यांच्यामते, गटबंधनाच्या घटनेतील आर्थिक व्यवहारांशी संबंधित असलेल्या तरतुदींचे योग्य पालन केले गेले आहे;

८.११ गटबंधनातून राजीनामा देणाऱ्या किंवा बहिष्कृत झालेल्या सदस्य संघटनांचा गटबंधनाच्या निधीवर कोणताही दावा नसेल;

८.१२ गटबंधनातील सभासदांचा किंवा पदाधिकाऱ्यांचा गटबंधनाच्या निधी व मालमत्तेवर कोणताही अधिकार असणार नाही;

८.१३ गटबंधनाच्या सभासदांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी गटबंधनाकरिता केलेल्या कामाचा मोबदला वगळता गटबंधन आपल्या सदस्यांना कोणताही पैसा किंवा मालमत्ता देऊ शकत नाही. अशा प्रकरणांमध्ये, केलेल्या कामासाठी देय केलेली रक्कम वाजवी असणे आवश्यक आहे;

८.१४ गटबंधनाचे आर्थिक वर्ष, ज्या देशात सचिवालय स्थित असेल त्या देशाच्या नियमांनुसार निश्चित होईल;

# ९. संलग्न संघटनांची कर्तव्ये

## ९.१ गटबंधन व संलग्न संघटनांतील परस्पर संबंध

गटबंधन आपल्या संलग्न संघटनांच्या स्वायत्ततेचा आदर व कदर करेल. तथापि, संलग्न संघटनांनी, काँग्रेस व कार्यकारी समितीने त्यांच्या सदस्यत्वाच्या संबंधात मान्य केलेल्या निर्णयांची व धोरणांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे;

## ९.२ संलग्न संघटनांची कर्तव्ये

गटबंधनाशी संलग्न संस्था खालील कर्तव्ये पार पाडतील:

९.२.१ दर वर्षी ३१ डिसेंबर रोजी सचिवालयाला त्यांच्या निवडणुका, पदाधिकारी किंवाा सदस्यत्वात झालेले कोणतेही बदल तसेच नवीन संपर्कांच्या तपशीलांविषयी माहिती देणे;

९.२.२ त्याच्या क्षमतेनुसार आवश्यक असलेली इतर सर्व माहिती प्रदान करणे;

९.२.३ त्यांच्या वृत्तपत्रात, वेबसाइटवर व अन्य माध्यमांतून गटबंधनाच्या कार्याविषयी माहिती प्रसारित करणे व या माहितीच्या प्रती किंवा लिंक सचिवालयाला पाठवणे;

९.२.४ त्यांच्या वार्षिक अहवालाच्या प्रती सचिवालयाला पाठवणे;

९.२.५ वरील कलम ६ नुसार संलग्नता शुल्क नियमितपणे भरणे;

९.२.६ काँग्रेसमध्ये तसेच गटबंधनाच्या अन्य कार्यात सहभागी होणे;

९.२.७ संयुक्तपणे केलेल्या जागतिक उपक्रमांमध्ये कौशल्ये, साहित्य व वित्त यांसारख्या संसाधनांचे योगदान/सामायिकीकरण करून एकतेची भावना व वर्तणूक विकसित होण्यास सहाय्य करणे.

# १०. संविधानाचा अन्वयार्थ

१०.१ या घटनेत वापरलेल्या संज्ञांच्या किंवा त्यासंबंधात उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबींच्या अन्वयार्थाची जबाबदारी काँग्रेसवर असेल. कॉंग्रेसच्या दरम्यानच्या काळात, कार्यकारी समितीला कॉग्रेसच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून, तात्पुरते नियम स्थापित करण्याचा व अन्वयार्थाशी संबंधित तात्पुरते निर्णय घेण्याचा अधिकार असेल;

१०.२ या घटनेच्या विविध आवृत्त्यांमध्ये अर्थाचा फरक असल्यास, इंग्रजी आवृत्ती ग्राह्य मानली जाईल.

# ११. घटनादुरुस्ती

मतदान प्रतिनिधींच्या पंचाहत्तर टक्के (७५%) बहुमताने, तसेच कोणत्याही प्रस्तावित बदलाची सर्व सदस्यांना किमान साठ (६०) दिवसांची आगाऊ सूचना देऊन, कॉँग्रेस या घटनेच्या तरतुदी रद्द करू शकते, दुरुस्त करू शकते किंवा त्यात भर घालू शकते.

# १२. अधिकारी/नेत्यांची नुकसानभरपाई

गटबंधनाचे पदाधिकारी, कार्यकारी समितीचे सदस्य, प्रतिनिधी व कर्मचाऱ्यांकडून गटबंधनाच्या किंवा त्यातील सदस्य संघटनांच्या वतीने, गटबंचनाचे हित लक्षात ठेऊन व सद्भावनेने आपली कर्तव्ये पाडत असताना झालेल्या कोणत्याही चुकांमुळे, निष्काळजीपणामुळे किंवा इतर कृत्यामुळे झालेल्या परिणामांची किंवा खर्चाची भरपाई गटबंधानाकडून केली जाईल, तसेच ते गटबंधनाच्या किंवा सदस्य संघटनांच्या कोणत्याही दायित्वांकरिता वैयक्तिकरित्या जबाबदार ठरणार नाहीत.

# १३. विसर्जन

१३.१ पोस्टल व इलेक्ट्रॉनिक मतपत्रिका वापरुन मतदान केल्यानंतर व मतदानासाठी पात्र असलेले किमान ऐंशी टक्के (८०%) प्रतिनिधी मतदानात सहभागी असल्यास, त्यापैकी पंचाहत्तर टक्के (75%) प्रतिनिधींनी मान्य केलेल्या ठरावाद्वारे गटबंधनाचे कधीही विसर्जन केले जाऊ शकेल;

१३.२ गटबंधन विसर्जित करण्याचा निर्णय कॉग्रेसने घेतल्यास, कोणत्याही आर्थिक दायित्वांची पूर्तता करणे आवश्यक असेल. गटबंधनाच्या निधी व मालमत्तेची विल्हेवाट लावण्याच्या पद्धतीवर कॉँग्रेस निर्णय घेईल;

१३.३ विसर्जनाचा ठराव घेणाऱ्या कॉँग्रेसने गटबंधनाच्या निधी व मालमत्तेची विल्हेवाट लावण्याच्या पद्धतीवर निर्णय घेतला नसल्यास, खालील तरतुदी लागू होतील:

a. नियुक्त केलेल्या शेवटच्या कार्यकारी समितीतील उपलब्ध सदस्य विसर्जन करण्याकरिता लिक्विडेटरची नियुक्ती करतील. लिक्विडेटर गटबंधनाचे सदस्य असणार नाहीत व त्यांच्या व उपरोक्त उपलब्ध सदस्यांच्या परस्पर सहमतीने त्यांचे शुल्क ठरविले जाईल;

b. अशा प्रकारे नियुक्त केलेले लिक्विडेटर, गटबंधनाच्या शेवटच्या पदाधिकाऱ्यांना व सचिवालयाला, गटबंधनाची मालमत्ता व दायित्वे दाखविणारी लेखापुस्तके, तसेच ज्या तारखेपासून गटबंधनाचे कार्य बंद झाले, व ज्याचा उल्लेख यापुढे विसर्जनाची तारीख असा केला जाईल, त्या तारखेच्या बारा (१२) महिने आधीची सदस्य-नोंदणी रजिस्टर्स, विसर्जनाच्या तारखेपर्यंत प्रत्येक सदस्याने भरलेले शुल्क, गटबंधनाचा सर्व खर्च न केलेला निधी, व गटबंधनाची संपत्ती रद्द करण्यासाठी आवश्यक असलेली मालमत्ता व कागदपत्रे, त्यांच्याकडे सुपूर्द करण्याचे आवाहन करतील;

c. गटबंधनाची कर्जे त्याच्या अखर्चित निधीतून तसेच त्याच्या मालमत्तेतून वसूल केलेल्या इतर कोणत्याही पैशातून फेडण्याकरिता लिक्विडेटर आवश्यक ती पावले उचलावीत;

d. वरील कलमानुसार सर्व कर्जे फेडल्यानंतर, जर उर्वरित निधी असेल तर, समान उद्दिष्टे व साध्ये असलेल्या इतर कोणत्याही नामोनिर्देश केलेल्या संस्थेकडे त्यातील सर्व किंवा काही मालमत्तेचे हस्तांतरण करून त्याची विल्हेवाट लावली जाईल, किंवा जोपर्यंत विसर्जित केलेल्या संस्थेच्या कार्यक्षेत्राशी व व्याप्तीशी संपूर्णत: किंवा अंशतः साधर्म्य असलेली दुसरी संस्था स्थापन केली जात नाही तोपर्यंत हा निधी ट्रस्टमध्ये ठेवला जाईल. या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या सर्व संस्थांकरीता तो खुला असेल.

# १४. जोडलेले नियम

या घटकेस निर्माण करण्याची व अंगीकार करण्याची आवश्यकता असलेले परंतु तेवढ्यापुरतेच सीमित नसलेले नियम व कार्यपद्धती, खालीलप्रमाणे आहेत:

- सदस्यत्वाचा अर्ज.

- बैठकी आयोजित करण्याकरिता स्थायी आदेश.

- काँग्रेस आयोजित करण्याकरिता  स्थायी आदेश.

- आंतरराष्ट्रीय काँग्रेसमध्ये कार्यकारी समितीतील सदस्यांच्या निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रिया.

- आंतरराष्ट्रीय काँग्रेसमधील निवडणूक प्रक्रिया.

- उप-समित्यांकरिता संदर्भ अटी.